ठाणेवैभव



## थोडक्यात

## केंद्रीय अर्थसंकल्प विषयावर व्याख्यान

ठाणे, दि.१(वार्ताहर) - ठाणे भारत सहकारी बँक लि. शेड्यूल बँक आयोजित केंद्रीय अर्थसंकल्प २०१३-१४ या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी अर्थतज्ज्ञ गिरीष कुबेर वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून हे व्याख्यान सहयोग मंदीर, पहिला मजला, सहयोग मंदीर पथ, घंटाळी, नौपाडा ठाणे येथे शनिवार २ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिज्ञासा ट्रस्टतर्फे विज्ञान दिन साजरा

ठाणे, दि.१(वार्ताहर) - जिज्ञासा ट्रस्ट संस्थेच्यावतीने कोपरी ठाणे पूर्व येथील ठामपाच्या १६ नंबरच्या शाळेत विज्ञानदिन उत्साहात साजरा झाला.

विविध उपकरणांच्या सहाय्याने स्वप्रयोग आणि खेळण्यातून विज्ञानातील संकल्पना समजून घेणे हे या केंद्राचे उद्दिष्ट आहे. विज्ञान दिनाचे औचित्य साधून शाळेतील विज्ञान केंद्रात म.ना.प. शाळेतील विद्यार्थ्यांनी पृथ्वीभोवती फिरणारे स्थिर आणि फेरी मारणारे उपग्रह, चंद्र आणि सुर्यग्रहण, विविध ग्रहांवरील आपले वजन, गुरुत्वकर्षणाचा नियम सांगणारा झुलता मनोरा, ध्वनीलहरी, चुबकत्व, सायकल चालवताना हालचाल करणारा मानवी शरीरातील हाडांचा सांगाडा अशा विविध तीस उपकरणांशी खेळून विज्ञानाचा आनंद लुटला. जिज्ञासाचे कार्यकारी विश्वस्त सुरेंद्र दिघे आणि सुमिता दिघे यांनी शाळेतील शिक्षिका दिपीका पाटील, निर्मला कापडणे यांच्या मदतीने विज्ञानाच्या संकल्पना विद्यार्थ्यांना समजाऊन सांगितल्या. शाळा नं.१६ च्या मुख्याध्यापिका सौ. तांडेल यांचे सहाय्य या उक्रमास लाभले होते.

## विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ

ठाणे, दि.१(वार्ताहर) - रामायणाची परीक्षा देऊन त्यात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि पारितोषिक वितरण समारंभ रामायण कथा अभ्यास समितीतर्फे आयोजित केला आहे.

शनिवार २ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ७ यावेळेत उमा निळकंठ व्यायाम शाळेचे पटांगण, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे येथे हा कार्यक्रम होणार आहे. राजा शिवाजी विद्यामंदीरचे जयंत घाडगे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

जास्तीत जास्त नागरिकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरीता या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## शहर दैनिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संजय पितळे

ठाणे, दि.१(वार्ताहर) - ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत संघाच्या कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा विद्यमान अध्यक्ष संजय पितळे यांच्यावर सोपविण्यात आली.

दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहातील हॉलमध्ये २८ फरब्रुवारीला झालेल्या सर्वाधाण सभेत कार्यकारिणीची निवड करण्यात आली. १४ सदस्य असलेल्या कार्यकारिणीच्या निवडीवर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. अध्यक्षपदी संजय पितळे (दै.वार्ताहर), कार्याध्यक्ष विकास काटे (साम टि.व्ही.) उपाध्यक्ष राहूल लोंढे (सम्राट), सरचिटणीस दिलीप शिंदे (पुढारी), खजिनदार कपिल राऊत (झी-२४), सहसचिव श्रीराम भिडे (ठाणे परिक्रमा), यांची निवड झाली. तर सदस्य म्हणून सिराज बेग(डीएनए), अतुल मळेकर(प्रहार), अमर राजभर(चौफेर दृष्टी), नितीन बोरसे(ठाणे वर्तमान), विभव बिरवटकर(सकाळ), दिपक शेलार(नवाकाळ), निलेश पानमंद(लोकसत्ता) आणि जितेंद्र कालेकर (लोकमत) यांची तीन वर्षासाठी निवड झाली.

## मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

ठाणे, दि.१(वार्ताहर) - मराठी राजभाषा दिन आणि साहित्य क्षेत्रातील सिध्दहस्त लेखक, कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या वर्तकनगर माध्य. विद्यालयात आयोजित केलेला मराठी दिन उत्साहात साजरा झाला.

या समारंभासाठी प्रमुख अतिथी प्रा. अरविंद दोडे, संस्थेचे विश्वस्त आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाकर जोग, संस्थेचे चिटणीस केदार जोशी, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता सातवळेकर आणि उपमुख्याध्यापक श्री. ठाणेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि सर्वात्मका शिवसुंदरा या गीताने झाला. मुख्याध्यापिका सौ. सातवळेकर यांनी शाळेच्या प्रास्ताविकातून शोच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर वक्तृत्व स्पर्धेतील बक्षीसपात्र विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यालयातील शिक्षिका सौ. राजे शिर्के यांनी कथेचे वाचन केले.

प्रमुख पाहुण्यांनी मराठी भाषेचा इतिहास, कुसुमाग्रजांचा जीवन परिचय आणि उपदेशपर कथांतून मुलांना मार्गदर्शन केले.केदार जोशी यांनी ग्लोबल मराठी होण्यासाठी 'बहुभाषिक व्हा' असा संदेश दिला. त्यानंतर वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांचा हस्ते बक्षीस देण्यात आली विद्यालयातील शिक्षिका मानली सूर्यवंशी यांनी मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे निवेदन विद्यालयातील शिक्षिका शुभांगी काटकर यांनी केले.



विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवणाऱ्या ॲम्कोच्या परिवर्तन चळवळीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन ठाण्याचे पोलीस आयुक्त के.पी. रघुवंशी यांनी ठामपा शाळेतील विद्यार्थ्यासमवेत केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पोलीस खात्याबाबत मार्गदर्शन केले. उद्घाटनप्रसंगी लायन महेश गुप्ता, अम्को फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रामास्वामी, मिनाक्षी जैन आदी उपस्थित होते. यावेळी के.पी. रघुवंशी यांना सर्वांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. (छाया:रामसिंह

## ठामपाकडून सुपरस्पेशालिटी वैद्यकीय सेवा माफक दरात मिळाव्यात-विलास सामंत

**ठाणे, दि.१(वार्ताहर) - ठामपाच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात शहरातून तसेच जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून शेकडो रुग्ण उपचारार्थ येत असतात. या रुग्णांना एन्जीओग्राफी, एन्जीओप्लासी, बायपाससारख्या सुपरस्पेशालिटी वैद्यकीय सेवा माफक दरात मिळाव्यात, अशी मागणी ज्येष्ठ नगरसेवक विलास सामंत यांनी केली आहे.**

ठाण्याची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून जवळ-जवळ २० लाख लोकसंख्या ठाण्याची आहे. धावपळ आणि वाढत्या प्रदुषणामुळे अनेक आजारांनी नागरिक त्रस्त आहेत. यामध्ये हृदयविकाराचे रुग्ण लक्षणीय आहेत. हृदयविकाराच्या रुग्णांना खाजगी रुग्णालय किंवा मुंबईतील शासकीय रुग्णालयात जावे लागते. ही बाब त्यांना परवडणारी नाही. महापालिकेच्या माध्यमातून यापूर्वी सिटी स्कॅन सेंटर आणि डायलेसिस सुविधा अल्पदरात उपलब्ध करून दिली आहे. याच धर्तीवर महापालिकेच्या माध्यमातून एन्जोओग्राफी, एन्जोओप्लास्टी आणि बायपास आदी सुविधा माफक दरात उपलब्ध करून मिळाव्यात, यासाठी ज्येष्ठ नगरसेवक विलास सामंत यांनी ठाण्यातील सर्व आमदार, महापौर, उपमहापौर, सभापती-स्थायी समिती, सभागृहनेते, विरोधी पक्षनेते आणि आयुक्त यांना लेखी पत्रान्वये विनंती केली असून येत्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी भरीव तरतूद करण्याचीही मागणी केली आहे.

महापालिका आयुक्त यांनी सन २०१३-१४ चा अर्थसंकल्प सादर करताना एन्जोओग्राफी आणि एन्जोओप्लास्टी आदी सुविधा माफक दरात उपलब्ध करून दिल्या जातील असे जाहीर केले आहे. अर्थसंकल्पात भरीव तरतूद करून ठाण्यातील गोरगरिब जनतेला या सुविधा उपलब्ध होतील आणि त्यांना दिलासा मिळेल अशी आशा विलास सामंत यांनी यावेळी व्यक्त केली.

## लोककलावंत प्रतिष्ठानचा वर्धापन दिन साजरा

ठाणे, दि.१(वार्ताहर) - महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठान या संस्थेचा सहावा वर्धापन दिन सोहळा ठाणे येथील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात साजरा झाला.

यावेळी लोककलावंतांनी शाहिरी, पोवाडा, लोकगीते आणि लोकनृत्ये सादर करून उपस्थित जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले. रमेश नाखवा, शाहिर शांताराम चव्हाण, कृष्णाकांत जाधव आदी शाहिरांनी शाहिरी गीते गायिली.

## मनसे आदर्श पुरस्कार सोहळा उत्साहात

मुरबाड, दि.१(वार्ताहर) - महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने तालुक्यात कविवर्य कुसुमाग्रज तथा वि.वा. खाडकर यांच्या जन्म दिवसानिमित्ताने यावर्षी समाजातील उल्लेख कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंना पुरस्कार देवून आगळा वेगळा मराठी भाषा दिन साजरा केला.

यावेळी आदर्श पोलीस अधिकारी भोर, कर्मचारी संजय घुडे, आदर्श समाजसेवक गणतप विशे, नारायण राणे, गौतम साटम, कचरु खंडागळे, हसन पानसरे, सुनिल देशमुख, आदर्श संस्थापक जुगल जाखोटिया, आदर्श शिक्षक गणेश वाघ, शिक्षिका सुमन पाटील, उच्च माध्यमिक शिक्षक प्रकाश घोडके, आदर्श मुख्याध्यापक जयवंत सुर्यराव, मुख्याध्यापिका मनिषा देसले, आदर्श साहित्यिक योगेंद्र बांगर, नाटककार एकनाथ देसले, आदर्श वक्तृत्व पटू नितेश डोंगरे, क्रिडा पटू सागर कापडी, पत्रकार मुरलीधर दळवी, संगीत कला कांताभाऊ घागस, आदर्श प्रवचनकार ह.भ.प. भाऊ हरड, युवा किर्तनकार हिम्मत महाराज गगे, माध्यमिक शिक्षक विनोद देशमुख, डॉक्टर श्री. वानखेडे, आदर्श वकिल संतोष पोतदार, आदर्श कामगार वसंत भोईर, गुणवंत विद्यार्थी रुपेश गायकवाड, औषध सेवा समीर शहा, आदर्श परिचारिका ताराबाई घायवट, आदर्श शेतकरी तानाजी महाद्दी, उद्योजक धनाजी ठाकरे, शासकीय कर्मचारी शशकांत चौधरी, अशोक तारमळे, डॉक्टर फड अशा विभूतीना गौरविण्यात आले. यावेळी प्रा. गणेश शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

## गुजरात वीज कंपनी अवलंबणार महावितरणाचे फ्रॅन्चायझी मॉडेल

**मुंबई, दि.१(वार्ताहर) - महावितरणाने यशस्वीरित्या राबविलेल्या वितरण फ्रॅन्चायझी मॉडेलची माहिती घेण्यासाठी पश्चिम गुजरात वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच प्रकाशगड आणि भिवंडी येथे भेट दिली. विद्युत क्षेत्रात अनुकरणीय ठरलेले भिवंडी मॉडेल गुजरातमध्येही राबविण्याचा विचार या कंपनीने व्यक्त केला आहे.**

पश्चिम गुजरात वीज कंपनीचे मुख्य अभियंता जी.बी. पारेख यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या चमूने आपल्या दोन दिवसीय दौऱ्यात भिवंडी येथील वितरण फ्रॅन्चायझीच्या अंमलबजावणी-बाबत सविस्तर माहिती घेतली. महावितरणचे संचालक दत्तात्रय वाव्हाळ यांनी या चमूचे स्वागत केले. यावेळी अधिक्षक अभियंता (वितरण फ्रॅन्चायझी) बी.वाय खंडाईत आणि एन.सी. अमझरे यांनी वितरण फ्रॅन्चायझी मॉडेलची माहिती सादरीकरणाद्वारे मांडली. भिवंडी येथील अधीक्षक अभियंता तथा संपर्क अधिकारी श्री. बी.बी. जडकर आणि इतर अभियंते, अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. संचालक (वित्त) श्री. दत्तात्रय वाव्हाळ यांच्यासोबत झालेल्या बैठकीत महावितरणने आणि टोरॅन्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कौतूक केले आणि हा प्रयोग राबविण्यासाठी भविष्यातही अशाच प्राकारे सहकार्याची अपेत्रा व्यक्त केली.

भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणात वीजचोरी होत होती. तसेच वीज बिल भरण्याचे प्रमाण अत्यंत कमी होते. त्यावर तोडगा महावितरणने देशात प्रथमच वितरण फ्रॅन्चायझीचा प्रयोग करून भिवंडी शहराची जबाबदारी मे. टोरॅन्ट पॉवर लि. यांच्याकडे सोपविली. प्रयोग आता इतर राज्यातही राबवण्यात येणार आहे.

## अपेक्षाभंग करणारे अंदाजपत्रक - खोंबेटे

**ठाणे, दि.१(वार्ताहर) - मोठ्या आणि मध्यम उद्योगांपेक्षा लघु उद्योग क्षेत्रामुळे विकासाला मोठा हातभार लागला असतानाही कोणत्याही स्वरुपाचे विशेष उत्तेजन लघु उद्योग क्षेत्राला अंदाजपत्रकातून नसल्याने मोठा अपेक्षाभंग झाला आहे, असे मत चेंबर ऑफ स्मॉल इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष आर. खांबेटे यांनी व्यक्त केले आहे.**

लघुत्तम आणि लघु उद्योगांची कमाल मर्यादा गाठल्यानंतरही त्यांच्या सवलती आणखी तीन वर्षे जशाच्या तशा चालु ठेवण्याची तरतूद कागदावर चांगली वाटत असली तरी प्रत्यक्षात अशा कोणत्याही विशेष तरतुदी नाहीत की ज्यामुळे त्याची स्पर्धात्मक ताकद वाढेल. कुशलतावाढीसाठी अधिक निधी देणे किंवा फॅक्टरींगसाठी सिडबीला अधिक निधी देणे हे सर्व अप्रत्यक्ष फायदे असून त्याच्या अंमलबजावणीचे अनुभव लक्षात घेता ते कितपत पोहचतील याची साशंकता वाटते. मोठ्या उद्योगांसाठीच्या इनव्हेस्टमेंट अलाउन्सच्या तरतुदींमुळे लघु उद्योजकांस पायाभूत क्षेत्रात काही काम मिळू शकेल परंतु ते पुरेसे नाही. एकंदरीत लघु उद्योगांस निराशा दणारा असा हा अर्थसंकल्प आहे असे प्रतिपादन श्री. खांबेटे यांनी केले.

## कर्जाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

भिवंडी दि.१(वार्ताहर) – घर आणि दुकानासाठी गृह कर्ज काढून देतो असे आमिष दाखवून एका महिलेची ४८ हजार ५ ० ० रुपयांची फसवणूक केल्याची घटना सरवली येथे घडली.

विजया शिवलिंग (४०) असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव असून त्या सरवली गावात राहत आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे त्यांना कर्जाची आवश्यकता होती. त्यावेळेस भिवंडी –कल्याण मार्गावरील गोवे टोल नाक्याजवळ मानधने नगर येथील सुनील भोळे याने त्यांना गृह कर्ज काढून देतो असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला आणि २००९ पासून ते आजपर्यंत कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली थोडे–थोडे करून तब्बल ४८ हजार ५ ० ० रुपये फसवणूक करून घेतले, आणि आजपर्यंत कोणतेही कर्ज मिळवून दिले नाही. आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात येताच शिवलिंग यांनी कोनगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. सुनिल याला न्यायालयाने मंगळवार पर्येत पोलिस कोठडी सुनवली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक आव्हाड करीत आहेत.






न्यू स्वप्नपूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष कमलाकर वरबडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सा. मराठी मुंबईचे संपादक मधुसूदन सुगदरे, सहसंपादक शशिकांत सावंत, न्यू स्वप्नपूर्ती पतसंस्थेचे व्यवस्थापक दिगंबर चव्हाण, संचालक हरिष शेलार, जिद्द बहुउद्देशीय सेवा संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र माने आदी. वाढदिवसानिमित्त सिव्हील हॉस्पीटलमधील रुग्णांना सर्व मान्यवरांच्या हस्ते फळवाटप करण्यात आले.

## विजयालक्ष्मी वाजपेयी यांचे निधन

ठाणे, दि.१(वार्ताहर) - टिटवाळा येथे राहणाऱ्या कवी विजयालक्ष्मी वाजपेयी (५६) यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले आहेत.



विजयालक्ष्मी यांना गायनाची आवड होती. महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळ, मुंबई तसेच वृत्तपत्र लेखक संघाच्या त्या सक्रीय कार्यकर्त्या होत्या. त्याचप्रमाणे मुंबई प्रदेश राष्ट्रवादी महिला सेल माजी सहसचिव, करीरोड, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ महिला कार्याध्यक्ष, साप्ताहिक अनमोल टाईम्सच्या त्या संपादक होत्या.

## मुंबई - नाशिक महामार्गावर अपघात

शहापूर, दि.१(वार्ताहर) - मुंबई - नाशिक महामार्गावर वेहेळोली फाट्यावर अज्ञात वाहनांने दिलेल्या घडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला.

मुंबई - नाशिक महामार्गावरील वेहेळोली फाट्यावर दुपारी ४ वाजता मुंबईकडे जाणाऱ्या राम यशवंत सासे ३९ रा. नांदवळ यांचा जागीच मृत्यू झाला. ते जिव्हल इंटरप्रायझेसचे सुपरवायझर म्हणून काम करत होते. कंपनीच्या कामासाठी ते व्हिजीटसाठी वेहळोली येथे जात असताना हा अपघात झाला.

## किरण नगरकर यांच्या मुलाखतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई, दि.१(वार्ताहर) - कोणतीही साहित्यकृती वाचताना तिचा लेखक कोण, तो काय करतो, त्यांचं व्यक्तिगत आयुष्य काय या प्रश्नांना काय अर्थ असतो? लेखक जे लिहितो त्याचा संबंध त्याच्या व्यक्तिगत आयुष्याशी जोडणं चुकीचं नाही का? असा प्रश्न सुप्रसिध्द कादंबरीकार किरण नगरकर यांनी उपस्थित केला.**

पॉप्युलर प्रकाशन आणि महाराष्ट्र सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या प्रिय रसिक कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. किरण नगरकर आणि त्यांच्या कादंबऱ्यांच्या अनुवादीका रेखा सबनीस यांची मुलाखत सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि स्टारप्लसचे प्रमुख नचिकेत पंतवैद्य यांनी घेतली. या दोघांनी विचारलेल्या प्रश्नांना मनमोकळी उत्तरे देणाऱ्या नगरकर यांनी श्रोत्यांनादेखील चर्चेत सहभागी करुन घेत रसिकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. आपण इंग्रजीत लिहिण्यास का उद्युक्त झालो, कादंबऱ्यांमध्ये कथानकाच्या अनुषंगाने येणारा सेक्स, ककल्ड कादंबरीच्या लेखनामागचा इतिहास अशा अनेक विषयांवर नगरकरांनी आपले विचार मोकळेपणाने मांडले.

किरण नगरकर यांच्या कादंबऱ्या आवडल्या म्हणून मी त्यांचे मराठी अनुवाद केले, गॉड्स लिटल सोल्जर तेवढी भावली नाही त्यामुळे त्यांचा अनुवाद माझ्याकडून झाला नाही, असे मनमोकळे उत्तर रेखा सबनीस यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला पॉप्युलर प्रकाशनाच्या संपादिका अस्मिता मोहीते यांनी आयोजकांतर्फे पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय करून दिला.





छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सवानिमित्त काँग्रेस लोकमान्यनगर विभागातर्फे भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सामन्यांचा शुभारंभ मेहुल याने नाणेफेक करून केला. याप्रसंगी आयोजक परेश राठोड, सतीश भाऊ पगारे, उत्तम सिनगारे, प्रमिला पाटील, मार्शल पन्हाळकर, नागेश रावळ, सुर्यकांत पांचाळ, शंकर पाटील, राजेश कांबळे, मयुर जाधव, नितीन सुर्यवंशी, मिलिंद गायकवाड, चंद्रकांत बनसोडे आदी उपस्थित होते. यानिमित्ताने झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात स्वप्नील पगारे आणि अमृता त्रिभुवन या बालकलाकारांनी उपस्थितांचे मनोरंजन केले.

## समायोजन बदल्यांमधील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करा - कास्ट्राईब महासंघ

शहापूर, दि.१(वार्ताहर) - शिक्षकांच्या समायोजन बदल्याच्या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टचार झाला असून त्याबाबात संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे ठाणे जिल्हा सचिव सुरेश विशे आणि तालुका अध्यक्ष सुरेश भोकरे यांनी केली आणि सन २०१०-११ आणि २०१२-१३ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या समायोजन बदल्या करण्यात आल्या त्यापैकी १५ ते २० शिक्षक दिलेल्या शाळांवर हजर झालेच नाहीत ते सगळ मॅनेज करून रजेवर निधून गेले. मात्र त्यांचे रजेचे पगार, नियमीन पगार वेळेवर अदा करण्याची काळजी अधिकाऱ्यांनी घेतली. शिवाय त्यांच्या प्रतिनियुक्त्यादेखील केल्या. त्यांना बदली शाळेवर पाठविण्याची तसदी घेतली नाही. या प्रकरणात अधिकाऱ्यांनी आपले हात चांगलेच ओले करून घेतल्याचा आरोप करून अशा अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशीची मागणी कास्ट्राईब महासंघाने केली आहे.